**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

# प्रेसनोट

**दिनांक:- ०५/०९/२०१८**

## मालेगाव शहरात मोटरसायकल चोरी करणारे सराईत गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात, ०६ महागडया मोटर सायकल हस्तगत

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे आदेशान्वये जिल्हयातील मालाविरूध्दचे गुन्हयांना प्रतिबंध होणेसाठी सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्याची कारवाई सुरू आहे. जिल्हयातील वाढते चोरी, घरफोडी, मोटर सायकल चोरी तसेच गंभीर गुन्हयांतील सराईत गुन्हेगारांचा मागमुस काढुन गुन्हेगारीला प्रतिबंध करणेसाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची धडक कारवाई चालु आहे. **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**. व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. निलोत्पल सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी जिल्हयातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा आढावा घेवुन त्यांचे सध्याचे ठावठिकाण व हालचालींबाबत सविस्तर माहिती घेणेबाबत स्थागुशाचे पथकास सुचना दिल्या आहे.

त्यानुसार दिनांक ०४ सप्टेंबर २०१८ रोजी स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी सराईत गुन्हेगारांचा शोध घेणेसाठी मालेगाव शहरात गस्त घालत असतांना, पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना खब-यांमार्फत मिळालेल्या माहितीनुसार काही इसम मालेगाव शहरात चोरी केलेल्या महागडया मोटर सायकल कमी किंमतीत विक्री करणार असल्याचे समजले. त्याप्रमाणे स्थागुशाचे पथकाने मालेगाव सवंदगाव फाटा परिसरात सापळा रचुन संशयीत इसम नामे **१) फैय्याज अहमद रियाज अहमद,** वय २५, रा. सवंदगाव फाटा, आलीया हाज्जीन मशिदजवळ, मालेगाव, **२) अजीज उर्फ जुम्मन अहमद नजीर अहमद,** वय ३४, रा. जाफरनगर, मालेगाव यांना शिताफिने ताब्यात त्यांचे कब्जातुन एक पल्सर व एक हिरो पॅशन प्रो अशा दोन मोटर सायकल जप्त करण्यात आल्या. सदर मोटर सायकलचे कागदपत्रांबाबत विचारपुस करता त्यांनी उडवा-उडवीची उत्तरे दिल्याने पोलीस खाक्या दाखविताच त्यांनी सदर मोटर सायकल राधिका हॉटेल व आझादनगर भागातुन चोरी केली असल्याची कबुली दिली आहे. सदर आरोपींना अधिक विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी त्यांचा **साथीदार नामे ३) मोहमद एकलाख मोहमद शरिफ,** वय २२, रा. राहुलनगर, कालीकुट्टी मालेगाव याचेसह मालेगाव शहरातील विविध ठिकाणांवरून मोटर सायकली चोरी केल्याची कबुली दिली आहे.

आरोपी मोहमद एकलाख मोहमद शरिफ यास मालेगाव राहुलनगर, कालीकुट्टी परिसरातुन ताब्यात घेण्यात आले असुन त्याने त्याचे वरील साथीदारांसह **आझादनगर, मालेगाव किल्ला, कॅम्प रोड तसेच चाळीसगाव शहर परिसरात** मोटर सायकल चोरी केल्याची कबुली दिली आहे. सदर आरोपीतांचे कब्जातुन **०२ बजाज पल्सर, ०२ हिरो पॅशन प्रो, ०१ होण्डा शाईन, ०१ हिरो स्प्लेंडर** अशा **एकुण ०६ मोटर सायकल किं.रू. १ लाख ८५ हजार चा मुद्देमाल हस्तगत** करण्यात आलेला आहे. ताब्यात घेतलेले वरील तीनही आरोपीतांनी कबुली दिलेवरून **मालेगाव किल्ला, छावणी, आझादनगर** पोलीस ठाण्यांसह जळगाव जिल्हयातील **चाळीसगाव शहर** पोलीस ठाणेस दाखल असलेले **मोटर सायकल चोरीचे एकुण ०४ गुन्हे उघडकीस** आलेले आहे. जप्त करण्यात आलेल्या मोटर सायकल व आरोपीतांना गुन्हयाचे पुढील तपासकामी मालेगाव किल्ला व आझादनगर पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे. सदर आरोपी हे सराईत असुन त्यांचे इतर साथीदारांचा स्थागुशाचे पथक शोध घेत असुन मोटर सायकल चोरीचे मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** सपोनि **श्री. संदिप दुनगहु**, सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा वसंत महाले, राजु मोरे, सुहास छत्रे, सुनिल पानसरे, पोना राकेश उबाळे, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ यांचे पथकाने सदर मोटर सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणुन कामगिरी केली आहे.